# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-२२६३/२०१७ मधील तक्रार क्र.२६४/२०१८

अपिलार्थी, श्री. दिलीप मुकूंद पाटील
वसई भंडारी आळी, कोळीवाडा रोड,
ता. पो. वसई, जि. पालघर

विरुध्द

जन माहिती अधिकारी, कनिष्ठ अभियंता, नगररचना,
वसई विरार शहर महानगरपालिका, ता. वसई, जि. पालघर.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०५/०२/२०१८**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १४.०३.२०१७ | .... | २४.०४.२०१७ | .... |

अपिलार्थी यांनी आयोगास सादर केलेल्या दिनांक १२.०६.२०१७ रोजीच्या द्वितीय अपिलावर आज दिनांक ०५.०२.२०१८ रोजी फास्ट ट्रॅक सुनावणी (Fast Track Hearing) घेण्यात आली. सदर सुनावणीस उभयपक्ष उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, त्यांच्या दिनांक १४.०३.२०१७ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दि.०२.०६.२०१७ च्या आदेशामध्ये हा विषय नगररचना विभागाशी सुद्धा निगडीत आहे असा उल्लेख आहे.

त्यावर जन माहिती अधिकारी, नगररचना यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, माहितीचा अर्ज सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित असल्याने दि.१७.०३.२०१७ रोजी अर्ज हस्तांतरित केला व अपीलार्थीस त्या विभागास संपर्क साधण्यास सांगितले

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १४.०३.२०१७ रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१.०१.२०११ ते दिनांक १५.०३.२०१७ पर्यंतची विस्तृत स्वरूपाची माहिती मागितलेली आहे. ही माहिती ३० दिवसात देता येत नाही. तसेच ही माहिती देण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाची प्रमाणाबाहेर साधनसामुग्री वळवावी लागेल. यास्तव ही माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(९)प्रमाणे देय नाही. मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी रिट याचिका क्रमांक ३८१८/२०१० (डी) राज्य माहिती आयुक्त, नागपूर विरुध्द तुषार धंनजय मांडलेकर मधील Letters patent क्रमांक २७६/२०१२ मध्ये दिनांक ३० जूलै २०१२ रोजी विस्तृत, व्यापक आणि सर्वसाधारण स्वरुपाच्या मागीतलेल्या माहितीच्या अनुषंगाने संबंधित कार्यालयास शोध घेवून माहिती गोळा करावी लागत असल्याने पुढीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे. "The principle lex non cogit ad imposibilia is clearly applicable to the fact of to the case. Law does not compel a person to do that which is impossible......" सबब,अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७ (९) व महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम २०१२ कलम ३(क) नुसार नेमक्या माहितीची मागणी करावी.

२. तथापि, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८)(ए)(३) अन्वये असे निदेश देण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी सर्व आरक्षित शासकिय व खाजगी जमिनीच्या आरक्षणाचा तपशील, ताबा घेतल्याची तारिख,सद्यस्थिती, जमिन अतिक्रमित झाली आहे किंवा कसे, जमिन विकसीत केली किंवा कसे याबाबतची माहिती वसई विरार महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तीन महिन्यात प्रसिद्ध करावी.

३. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
**(थँक्सी फ्रान्सिस थेकेकरा)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ५ फेब्रुवारी, २०१८.

KOKAN BANCH

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
प्रथम अपिलीय प्राधिकारी, शहर अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,वसई विरार शहर महानगरपालिका,ता. वसई, जि. पालघर.

**विवेचन**

तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपिलावरील दिनांक ९/२/२०१८ रोजीच्या तक्रारीवर आज दिनांक २६/११/२०१९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, आयोगाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले की, त्यांनी कार्यवाही केलेली नाही.

सुनावणीवेळेचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता दिसून आले की, सार्वजनिक प्राधिकरण यांनी सदर प्रकरणातील आयोगाच्या यापूर्वीच्या दि.५/२/२०१८ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.२ प्रमाणे काय कार्यवाही केली आहे याबाबत आयोगास ३० दिवसात खुलासा सादर करणेबाबत कळविणे योग्य होईल.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **सार्वजनिक प्राधिकरण तथा महानगरपालिका आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका** यांनी सदर प्रकरणातील आयोगाच्या यापूर्वीच्या दि.५/२/२०१८ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.२ प्रमाणे काय कार्यवाही केली आहे याबाबत आयोगास ३० दिवसात खुलासा सादर करावा.
२. तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**सही/-**
**(के.एल.बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २६ नोव्हेंबर, २०१९.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
श्री.बळीराम पवार (भा.प्र.से.),
महानगरपालिका आयुक्त,
वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, विरार पोलीस ठाणेसमोर, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर ४०१ ३०५.

KOKAN BANCH

**अपिल क्रमांक : के.आर-२२६३/२०१७ मधील तक्रार क्र.२६४/२०१८**

अपिलार्थी, श्री. दिलीप मुकूंद पाटील

**सुनावणी दिनांक ४.१२.२०२३ ( In Continuation of order dt. २६.११.२०१९)**

**विवेचन**

उपरोक्त आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-२० (१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण ३० दिवसांत आयोगास सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

सदर सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सौंदर्या संखे, अधिक्षक, वसई विरार शहर महानगरपालिका या उपस्थित आहेत.

**सुनावणीचा तपशील :**

विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सौंदर्या संखे, अधिक्षक, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी सुनावणीच्या वेळी युक्तिवाद केला की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सेवानिवृत्ती घेतली असून, या प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांनी दि.२७.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले आहे की, सदरची माहिती ही वसई विरार शहर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत निर्णय झाला

होता. त्यानुसार सदर माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि.२१.१२.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसे श्री. दिलीप मुकुंद पाटील तक्रारदार यांना दि.२४.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**आदेश**

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सेवानिवृत्ती घेतली असून, या प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांनी सादर केलेला खुलासा व त्यासोबतच्या कागदपत्रांवरून आयोगाचे समाधान झाले असून त्यांचा दि.२७.१२.२०१९ रोजीचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ डिसेंबर, २०२३

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

**(भूपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

KOKAN BANCH